शब्दांना सत्याची धार

प्रहार

RANE PRAKASHAN PRIVATE LIMITED

मुंबई ● मंगळवार, २१ एप्रिल २०२६

मुंबई, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, नाशिक येथून एकाचवेळी प्रसिद्ध ● वर्ष २२ ● अंक १९२ ● पाने १० ● ₹ ५.००

www.prahaar.in epaper.prahaar.in

वसईत मस्त्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्र सुरू होणार

पान : महामुंबई

सनरायर्झसच्या आर्मीतील हेन्री क्लासेन ऑरेंज कॅपचा मानकरी

पान : क्रीडा

छत्तीसगडमध्ये खासगी विमानाचा अपघात

जशपूर (छत्तीसगड) : छत्तीसगडच्या जशपूर जिल्ह्यात सोमवारी दुपारी एका चार्टर्ड विमानाचा भीषण अपघात झाला. हे विमान आरा टेकड्यांमधील रतनपहली जंगलात झाडांना व डोंगराला धडकल्याने कोसळले. अपघातानंतर विमानाने पेट घेतला होता. डोंगर परिसरातून धुराचे प्रचंड लोट व आगीच्या ज्वाळा दूरवरून दिसत होत्या. या अपघातात विमानातील वैमानिक व सह-वैमानिकाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

हे विमान नारायणपूर क्षेत्रातील रतनपहली जंगलावरून जात असताना अचानक डोंगराच्या दिशेने झुकले व वेगाने डोंगररांगांना जाऊन धडकले. धडक इतकी जोरात होती की विमानाचे तुकडे झाले आणि त्याला भीषण आग लागली. दुर्घटना घडलेला परिसर हा डोंगराळ आणि जंगल परिसर असल्याने मदतकार्यात सुरुवातीला मोठ्या प्रमाणावर अडचणी येत होत्या.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक गावकरी आणि पोलीस प्रशासनाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. विमानात एकूण किती लोक होते, याची अधिकृत माहिती अद्याप प्रशासनाकडून मिळालेली नाही, मात्र वैमानिकांचा मृत्यू झाल्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. हे विमान कोणाचे होते आणि कुठून कुठे जात होते, याचा शोध पोलीस घेत आहेत. तांत्रिक बिघाड किंवा खराब हवामानामुळे हा अपघात झाला असावा, असा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे. डीजीसीए कडून या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश दिले जाण्याची शक्यता आहे.

इराणमध्ये सत्तापालट ?

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सने घेतला देशाचा ताबा

इराणमध्ये पडद्यामागे सुरू असलेल्या हालचाली आता समोर आल्या आहेत. अमेरिकेने केलेली युद्धबंदी बुधवारी संपत असताना आणि पाकिस्तानात चर्चेच्या दुसऱ्या टप्प्याची सुरुवात होत असताना इराणमध्ये 'इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्स' राजसत्तेवर पूर्णपणे कब्जा मिळविला आहे. आयआरजीसीचे मेजर जनरल अहमद वाहिदी हे इराणचे सर्वात शक्तिशाली नेते बनले आहेत. यामुळे जगावर महायुद्धाचे संकट घोंघावू लागले आहे.

अमेरिकेने होर्मुझच्या सामुद्रधुनीत नाकेबंदी केल्यानंतर इराणने पुन्हा एकदा ही सामुद्रधुनी बंद केली आहे. त्यामुळे अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष नव्या वळणावर पोहोचला आहे. दोन्ही देशांतील हा संघर्ष मिटवण्यासाठी पाकिस्तानातील अहमदाबादमध्ये चर्चेची दुसरी फेरी आयोजित करण्यात आली आहे; परंतु या बैठकीचे भवितव्य अधांतरीच आहे. इराणची सत्ता आता कट्टरपंती इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्स अर्थात आयआरजीसीच्या हाती आल्याचा दावा केला जात आहे. आता इराणमध्ये सर्व महत्त्वाचे निर्णय आयआरजीसीकडून घेतले जात आहेत. गेल्या आठवड्याभरात हा बदल झाल्याचे सांगण्यात येत आहे. या बदलाअंतर्गत आयआरजीसीचे कमांडर अहमद वाहिदी आणि त्यांचे जवळचे सहकारीच आता देशाचे प्रमुख नेतृत्व म्हणून जबाबदारी पार पाडत आहेत. अमेरिकेने होर्मुझमध्ये इराणच्या जहाजावर हल्ला करून पुन्हा युद्धाला तोंड फोडले आहे. अमेरिकेचा अशाप्रकारे चीनहून इराणला येत असलेल्या जहाजावर ताबा मिळविणे इराणला पटलेले नाही.

परराष्ट्रमंत्र्यांना हटविले

वॉशिंग्टन येथील 'इन्स्टिट्यूट ऑफ द स्टडी ऑफर वॉर'च्या मतानुसार आयआरजीसीने इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची यांना बाजूला केले आहे. तसेच वरिष्ठ पातळीवर घेतले जाणारे सर्व निर्णय आता आयआरजीसीकडून घेतले जात आहेत. अमेरिकेसोबतच्या पहिल्या बैठकीनंतर अराघची यांनी होर्मुझची सामुद्रधुनी उघडण्याची घोषणा केली होती; परंतु हा निर्णय बदलून अमेरिकेला प्रत्युत्तर देण्यासाठी होर्मुझ बंदच असणे गरजेचे आहे, अशी भूमिका आयआरजीसीकडून घेण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.

शेवटच्या क्षणी इराणचा अमेरिकेसोबत चर्चेस नकार

पाकिस्तानची राजधानी इस्लामाबादमध्ये अमेरिका आणि इरान यांच्यातील शांतता चर्चेच्या दुसऱ्या फेरीची तयारी अंतिम टप्प्यात आहे. या पार्श्वभूमीवर संपूर्ण इस्लामाबादला छावणीचे स्वरूप आले असून कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. मात्र, या सगळ्यात इराणने पाकिस्तान आणि अमेरिकेला मोठा झटका दिला आहे. सध्या या चर्चेत सहभागी होण्याची कोणतीही योजना नाही, असे इराणने स्पष्ट केले आहे. इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते इस्माईल बघाई यांनी सोमवारी सांगितले की, 'इराण अद्याप अमेरिकेसोबतच्या या चर्चेसाठी कोणताही विचार केलेला नाही'. इराण आणि अमेरिका यांच्यातील युद्धविराम संपण्यासाठी ४८ तासांपेक्षा कमी वेळ शिल्लक असताना हा मोठा पेच निर्माण झाला आहे. इराणनने चर्चेत मध्यस्थी करणाऱ्या पाकिस्तानच्या भूमिकेवरही संशय व्यक्त केला आहे. नव्या फेरीसाठी आपले प्रतिनिधी इस्लामाबादला पाठवण्याचा सध्या कोणताही विचार नसल्याचे संकेत इराणने दिले आहेत. मात्र, असे असले तरी आपला मित्र देश असलेल्या पाकिस्तानला इराणने १० कलमी प्रस्ताव पाठवला आहे. पाकिस्तान निष्पक्ष राहण्याऐवजी अमेरिका आणि सौदी अरेबियाकडे झुकत असल्याची भीती इराणला आहे. यातच भर म्हणून, अमेरिकन नौदलाने इराणी मालवाहू जहाजे जप्त केल्याच्या घटना समोर आल्या आहेत.

अमेरिकन थिंक टँक 'इन्स्टिट्यूट फॉर द स्टडी ऑफ वॉर'च्या मते, जनरल वाहिदी यांनी इराणच्या लष्करी तंत्रासह राजनैतिक वाटाघाटींची सूत्रेही आपल्या हाती घेतली आहेत. याला सर्वोच्च नेते मोज्तबा खामेनी यांची मूक संमती असल्याचे सांगितले जात आहे. इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची हे हॉर्मुझचा समुद्री मार्ग उघडण्यास अनुकूल होते. मात्र, आयआरजीसीने हा निर्णय धुडकावून लावत उलट आपल्या 'फास्ट अटॅक शिप्स'च्या माध्यमातून हा मार्ग पूर्णपणे ब्लॉक केला आहे. संयुक्त अरब अमिरातीचे प्रमुख रणनीतीकार अब्दुल खालिक अब्दुल्ला यांनी खळबळजनक विधीन करताना यूएईला आता स्वसंरक्षणासाठी अमेरिकेची गरज नाही", असे अब्दुल्ला यांनी यावेळी म्हटले आहे.

विरोधकांचा बुरखा फाडण्यासाठी राज्यव्यापी आंदोलन

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

संसदेत महिला आरक्षण विधेयकाच्या विरोधात मतदान करून विरोधकांनी देशातील नारीशक्तीचा अपमान केला असून, या मानसिकतेचा 'बुरखा' फाडण्यासाठी महायुतीतर्फे राज्यव्यापी आंदोलन छेडले जाणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी येथे केली. १७ एप्रिल रोजी संसदेत जे घडले, तो देशाच्या इतिहासातील काळा दिवस असून महिलांच्या हक्कांची भ्रूणहत्या करणाऱ्या मारेकऱ्यांना जनता कदापि माफ करणार नाही, अशा तिखट शब्दांत मुख्यमंत्र्यांनी काँग्रेस आणि मित्रपक्षांवर हल्ला चढवला.

मुंबईत आयोजित एका विशेष पत्रकार परिषदेत फडणवीस बोलत होते. यावेळी विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, मंत्री पंकजा मुंडे, आदिती तटकरे, मेघना बोर्डीकर, चित्रा वाघ, खा. ज्योती वाघमारे यांच्यासह महायुतीतील महिला नेत्यांची उपस्थिती होती. २०२३ मध्ये महिला आरक्षण विधेयक जनगणना आणि परिसीमनानंतर लागू होईल, हे मान्य करणाऱ्या विरोधकांनी आता सरकारकडे दोन-तृतीयांश बहुमत नसल्याचे पाहून सरड्यासारखा रंग बदलला आहे, असा आरोप फडणवीस यांनी केला.

राहुल गांधींवर टीका करताना मुख्यमंत्री म्हणाले की, खोटे बोलण्याच्या जर ऑलिम्पिक स्पर्धा झाल्या, तर त्याचे सुवर्णपदक राहुल गांधींनाच मिळेल. संविधानाने दिलेल्या संकेतानुसारच हे विधेयक असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांशी प्रतारणा करणाऱ्या या नेत्यांनी महिलांची साष्टांग दंडवत घालून माफी मागायला हवी, संसदेत मांडण्यात आलेली विधेयके ही २०२३ च्या घटनादुरुस्तीचाच भाग होती.

महात्मा फुले यांच्या विचारांना तिलांजली

महात्मा फुले यांच्या २०० व्या जयंती वर्षांतच त्यांच्या विचारांना तिलांजली देण्याचे काम विरोधकांनी केले आहे. १९७१ ची लोकसंख्या गोठवून करण्यात आलेल्या रचनेत बदल करणे आणि प्रत्येक राज्याला समान संधी देणे हे पंतप्रधान मोदींचे उद्दिष्ट होते. या नवीन रचनेमुळे दक्षिण भारतातील राज्यांवर अन्याय होणार नव्हता, उलट त्यांचे प्रतिनिधित्व वाढणार होते, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले. प्रियंका गांधींवर बोलताना त्यांनी नमूद केले की, त्या राजकारणात नव्या असल्याने कदाचित त्यांना त्यांच्या लोकांनी पूर्ण माहिती दिली नसेल, त्यामुळे मी त्यांना दोष देत नाही. मात्र, २०११ च्या जनगणनेनुसार २०२९ ला हे विधेयक लागू व्हावे ही सरकारची शुद्ध भावना होती, जिला विरोधकांनी खीळ घातली. आता जनमताचा असा अभूतपूर्व रेटा उभा केला जाईल की, विरोधकांना गुडघे टेकून महिलांच्या हक्कांना मान्यता द्यावी लागेल, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

राजस्थानातील रिफायनरीला आग

पंतप्रधान मोदी आज करणार होते उद्घाटन

◆ पचपदरा (वृत्तसंस्था) :

राजस्थानच्या पचपदरा येथील बहुप्रतीक्षित रिफायनरीमध्ये सोमवारी दुपारी अचानक भीषण आग लागली. मंगळवारी, २१ एप्रिल रोजी सकाळी ११.३० वाजता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या रिफायनरीचे औपचारिक उद्घाटन होणार होते. या आगीमुळे रिफायनरीचे मोठे नुकसान झाले असून मंगळवारच्या कार्यक्रमावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

रिफायनरीच्या एका मुख्य प्रोसेसिंग युनिटमध्ये ही आग लागली. आगीची तीव्रता इतकी भीषण होती की, धुराचे काळे लोट सुमारे एक किलोमीटर अंतरावरूनही स्पष्ट दिसत होते. अग्निशमन दलाच्या २० हून अधिक गाड्यांतील जवानांनी आग इतर युनिट्समध्ये पसरू नये यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न केले.

उधमपूरमध्ये बस दरीत कोसळून २१ प्रवाशांचा मृत्यू

बसचे यापूर्वी आठ नियमभंग

◆ उधमपूर (वृत्तसंस्था) :

निसर्गाच्या कुशीत असलेल्या जम्मू-काश्मीरच्या उधमपूर जिल्ह्यात सोमवारी रक्ताचा सडा पडला. रामनगर परिसरातील कोहाटमध्ये झालेल्या भीषण बस अपघातात २१ प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला, तर ३१ जण मृत्यूशी झुंज देत आहेत. या घटनेने केवळ शोकच नाही, तर रस्ते सुरक्षा, ओव्हरस्पीडिंग आणि प्रशासकीय दुर्लक्षाबाबत संतापाची लाट उसळली आहे. या अपघाताचा सविस्तर तपास केला असता, अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत.

रामपूरहून उधमपूरकडे येणारी बस कोहाट भागातील पुलाजवळ आली असता, एका तीक्ष्ण वळणावर चालकाचे नियंत्रण सुटले आणि बस तब्बल १५० फूट खोल दरीत कोसळली. स्थानिक लोकांच्या मते, हा परिसर आधीच 'दुर्घटना क्षेत्र' म्हणून ओळखला जातो, पण प्रशासनाने याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले.

रेस्क्यू ऑपरेशन आणि मृतांचा आकडा :

घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि प्रशासनाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. स्थानिक नागरिकांच्या मदतीने बचावकार्य सुरू करण्यात आले. गंभीर जखमींना तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले असून, काही प्रवाशांची प्रकृती चिंताजनक असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

तपासातील सर्वात धक्कादायक माहिती म्हणजे, ज्या बसचा अपघात झाला तिचे रेकॉर्ड अत्यंत खराब होते. या बसवर या पूर्वीच ओव्हरलोडिंग आणि ओव्हरस्पीडिंगचे ८ नियमभंगाचे गुन्हे दाखल करण्यात आले होते. इतके गुन्हे नोंद असतानाही ही बस बिनदिक्कतपणे प्रवाशांची वाहतूक कशी करत होती? हा प्रश्न आता वाहतूक विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे करत आहे.

जेईई मेन परीक्षेत महाराष्ट्राचे सिद्धार्थ आठले आणि माधव विराडिया अव्वल

◆ पुणे (प्रतिनिधी) :

राष्ट्रीय पातळीवर देशातील नामांकित संस्थांमध्ये अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी घेतलेल्या 'जेईई मेन' दुसऱ्या सत्रातील परीक्षेचा निकाल सोमवारी जाहीर करण्यात आला. राष्ट्रीय परीक्षा एजन्सीने (एनटीए) निकाल जाहीर केला असून यात देशातील २६ विद्यार्थ्यांना १०० पर्सेंटाईल मिळाले आहेत. यात महाराष्ट्रातील सिद्धार्थ आठले आणि माधव विराडिया यांनी १०० पर्सेंटाईल मिळविले आहे. यातील माधव याने जेईई पहिल्या आणि दुसऱ्या अशा दोन्ही सत्रात १०० पर्सेंटाईल मिळविल्याचा विक्रम केला आहे.

'एनटीए'तर्फे बी.ई आणि बी. टेक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी ही परीक्षा घेण्यात आली. 'एनटीए'तर्फे जानेवारी आणि एप्रिल अशा दोन सत्रात ही परीक्षा घेतली. दुसऱ्या सत्रातील परीक्षा २,४,५,६ आणि ८ एप्रिल दरम्यान घेण्यात आली.

डोंबिवली स्थानकाजवळ लोकल घसरली; सेवा विस्कळीत

चाकरमान्यांना लेटमार्क, १२ लोकल अन्य मार्गांवर वळवल्या

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

मध्य रेल्वेच्या डोंबिवली स्थानकांजवळ लोकल ट्रेनचा डबा रुळावरून घसरल्यामुळे काही काळ रेल्वे वाहतूक ठप्प झाली होती. १२ लोकल अन्य मार्गावर वळवण्यात आल्या, तर ९ गाड्या रद्द करण्यात आल्या. प्रवाशांना गाड्या वेळेवर न मिळल्याने त्रास सहन करावा लागला.

ही लोकल ट्रेन कळवा कारशेडमधून कल्याणच्या दिशेने जात होती. त्यावेळी सकाळी ८.०९ वाजण्याच्या सुमारास डोंबिवली येथे एक डबा रुळावरून खाली घसरला. ही लोकल रिकामी असल्याने मोठी हानी टळली. डबा रुळावरून खाली घसरल्याने या मार्गावरील अन्य लोकल ट्रेनचाही खोळंबा झाला होता. मुंबईच्या दिशेने येणाऱ्या लोकल १५ ते २० मिनिटांने उशिराने धावत होत्या.

पावणेतीन तासांनंतर परिस्थिती पूर्वपदावर : अन्य गाड्यांचे वेळापत्रक कोलमडले. सीएसएमटीकडे येणाऱ्या लोकल ठाकुर्ली, कल्याण स्थानकात थांबून होत्या. या घटनेनंतर प्रशासनाने तत्काळ ६० कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या मदतीने लोकलचे चाक पुन्हा रुळावर आणण्यात यश मिळवले. लोकलचा शेवटून तिसरा डबा घसरल्याने ९ डबे आणि शेवटचे ३ डबे रेल्वेपासून वेगळे करण्यात आले. ३ डबे डोंबिवलीचे फलाट एकजवळ उभे करण्यात आले. अन्य डबे कल्याणच्या दिशेने नेण्यात आले. लोकल सेवा सकाळी १०.४५ वाजल्यापासून पूर्ववत सुरू करण्यात आली.

स्वरस्वामिनी आशा भोसले यांच्या अस्थींचे गंगेत विसर्जन

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

भारतीय संगीत क्षेत्रातील अढळ ध्रुवतारा आणि कोट्यवधी रसिकांच्या गळ्यातील ताईत असलेल्या स्वरस्वामिनी आशा भोसले यांच्या अस्थींचे सोमवारी वाराणसी येथील पवित्र गंगा नदीत विधीवत विसर्जन करण्यात आले. आशाताईंच्या अंतिम इच्छेनुसार, अत्यंत भावपूर्ण वातावरणात आणि त्यांच्याच अजरामर गाण्यांच्या सुरावलीत हा सोहळा पार पडला.

आशा भोसले यांच्या निधनाचा सोमवारी नववा दिवस होता. यानिमित्ताने वाराणसीतील नमो घाटापासून अस्थी विसर्जन यात्रेला सुरुवात झाली. आशाताईंच्या प्रतिमेने आणि फुलांनी सजवलेल्या एका विशेष बोटीतून त्यांचा अस्थिकलश नेण्यात आला. विशेष म्हणजे, या मुख्य बोटीच्या दोन्ही बाजूंनी एनडीआरएफच्या जवानांच्या नौकांकडून त्यांना मानवंदना देण्यात येत होती. गंगेच्या पात्रात संथपणे चाललेल्या या बोटीवर आशाताईंच्या गाण्यांचे मंद स्वर उमटत होते, ज्यामुळे संपूर्ण परिसर भावुक झाला होता.

नमो घाटावरून निघालेला हा प्रवास मंत्रोच्चारांच्या घोषात मणिकर्णिका घाटावर पोहोचला. तिथे आशाताईंचे चिरंजीव आनंद भोसले यांनी विधीवत पिंडदान केले आणि त्यानंतर अस्थींचे विसर्जन गंगेच्या पात्रात केले. यावेळी आनंद भोसले यांच्या पत्नी अनुजा भोसले आणि कन्या जनाई भोसले उपस्थित होत्या.

मंत्री आशिष शेलार यांची उपस्थिती : आशाताईंना अखेरच्या श्वासापर्यंत साथ देणारे त्यांचे मानलेले भाऊ आणि राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार हे या विधीसाठी विशेषतः उपस्थित होते. त्यांच्यासह स्थानिक आमदार अवधेश सिंह, योगेश खाडिलकर आणि 'जीवनगाणी' मित्रपरिवारातील सदस्यही यावेळी भोसले कुटुंबासोबत होते.

अजित डोवाल सौदी दौऱ्यावर

आखाती देशांशी संबंध अधिक मजबूत करण्यासाठी भारताचा 'हुकमी एक्का' मैदानात

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

पश्चिम आशियातील जागतिक समीकरणे झपाट्याने बदलताना दिसत आहेत. यातच भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल रविवारी अचानक सौदी अरेबियात पोहोचले. या दौऱ्यात त्यांनी सौदी अरेबियाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत ऊर्जा सहकार्यासह द्विपक्षीय संबंधांवर चर्चा केली. खरेतर, अमेरिका आणि इराणमधील वाढत्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर डोवाल यांचा हा दौरा अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

अजित डोवाल यांच्या या दौऱ्यासंदर्भात माहिती देताना, परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जायसवाल म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सूचनेनुसार खाडी देशांशी संबंध अधिक मजबूत करण्यासाठी डोवाल १९ एप्रिल रोजी सौदी दौऱ्यावर गेले. तिथे त्यांनी सौदीचे ऊर्जा मंत्री, परराष्ट्र मंत्री आणि त्यांच्या समपदस्थ सुरक्षा सल्लागारांशी उच्चस्तरीय चर्चा केली.

महत्त्वाचे म्हणजे, पाकिस्तान आणि सौदीमधील लष्करी करार आणि भारताचे सौदीशी असलेले जुने व्यापारी संबंध पाहता, अजित डोवाल यांचा हा दौरा भारताच्या सामरिक हितासाठी 'हुकमी एक्का' मानला जात आहे. या भेटीत, पश्चिम आशियातील परिस्थिती नेमकी कशी बदलत आहे आणि त्याचे भविष्य काय असेल, या मुद्द्यांवर अधिक भर होता.'

भारताची ४० टक्के तेल आयात ही खाडी देशांतून होते. 'होर्मुज स्ट्रेट' या जागतिक तेल पुरवठा मार्गावर निर्माण झालेल्या संकटामुळे भारताच्या तेल पुरवठ्यावर परिणाम होऊ शकतो. जर पुरवठा विस्कळीत झाला, तर देशात इंधनाचे दर वाढू शकतात. यामुळेच डोभाल तेल पुरवठा करणाऱ्या बड्या देशांशी संवाद साधत आहेत. अमेरिकेने इराणचे एक जहाज जप्त केले होते. यामुळ सोमवारी जागतिक तेल बाजारात मोठी खळबळ उडाली होती. आंतरराष्ट्रीय पातळीवर डोवाल यांचे संबंध पाहता त्यांनी शिष्टाई भारताला नेहमीच लाभदायी ठरलेली आहे.

सुनामीच्या इशाऱ्यानंतर जपानच्या किनाऱ्यावर बोटींची पळापळ

लाटांच्या तडाख्यापासून वाचण्यासाठी खोल समुद्राच्या दिशेने प्रवास

◆ टोकियो (वृत्तसंस्था) :

जपानच्या उत्तर भागात सोमवारी स्थानिक वेळेनुसार सायंकाळी ४.५३ वाजता ७.४ रिश्टर स्केल तीव्रतेचा शक्तिशाली भूकंप झाला. भूकंपाचा केंद्रबिंदू प्रशांत महासागरात जमिनीखाली अवघ्या १० किमी खोलीवर होता. जपानच्या हवामान खात्याने तत्काळ इवाते, आओमोरी आणि होक्काइडो प्रांतातील किनारपट्टी भागासाठी सुनामीचा इशारा जारी केला आहे. समुद्रात सुमारे ३ मीटर (१० फूट) उंचीच्या लाटा उसळण्याची भीती वर्तवण्यात आली असून नागरिकांना तातडीने सुरक्षित ठिकाणी हलवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

त्सुनामीचा इशारा मिळताच हचिनोहे आणि इतर बंदरांवरील जहाजांनी लाटांच्या तडाख्यापासून वाचण्यासाठी तातडीने खोल समुद्राच्या दिशेने प्रवास सुरू केला आहे. किनारपट्टीवर सुनामीच्या सूचनांचे फलक झळकत आहेत. भूकंपाच्या एक तासाच्या आत इवाते प्रांतातील कुजी बंदरावर ८० सेंटीमीटर (३१ इंच) उंचीची पहिली लाट धडकली आहे. पुढील काही तासांत लाटांची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे.

हा भूकंप उत्तर इवाते प्रांताच्या प्रशांत महासागरातील किनारपट्टीवर जमिनीखाली सुमारे १० किमी खोलीवर झाला. भूकंपाचे हादरे इतके तीव्र होते की, शेकडो किलोमीटर अंतरावर असलेल्या टोकियोमधील उंच इमारतीही हादरल्या. सुनामीच्या लाटा वारंवार किनारपट्टीला धडकू शकतात, त्यामुळे धोका पूर्णपणे टळेपर्यंत किनारपट्टीवर किंवा नद्यांच्या जवळ जाऊ नये, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

जपानमध्ये ७.४ तीव्रतेचा भीषण भूकंप

उत्तर किनारपट्टीला 'सुनामी'चा तडाखा बसण्याची शक्यता

३ मीटर उंच लाटांचा इशारा

प्रशासकीय पावले : जपानच्या पंतप्रधान कार्यालयाने या संकटाचा सामना करण्यासाठी तातडीने आपत्ती व्यवस्थापन कक्ष कार्यान्वित केला आहे. २०११ मध्ये जपानमध्ये आलेल्या ९.० तीव्रतेच्या भूकंपाच्या आठवणी या घटनेने ताज्या झाल्या आहेत, ज्यामध्ये १८ हजार ५०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला होता.

रेल्वे वाहतूक ठप्प : सुरक्षेच्या कारणास्तव टोकियो आणि शिन-आओमोरी दरम्यानची तोहोकू शिंकानसेन बुलेट ट्रेन सेवा तत्काळ थांबवण्यात आली आहे. आओमोरी आणि मियागी प्रांतातील ओनागावा आणि हिगाशिदोरी अणुऊर्जा प्रकल्पांमध्ये अद्याप कोणतीही समस्या आढळलेली नाही.

पंतप्रधानांचे आवाहन

जपानच्या पंतप्रधान साने टाकाइची यांनी तातडीने आपत्ती व्यवस्थापन कक्ष स्थापन केला असून, नागरिकांना सखल भागातून उंच ठिकाणी स्थलांतर करण्याचे आवाहन केले आहे. 'जीवितहानी टाळण्यासाठी सूचनांचे पालन करा आणि समुद्रकिनाऱ्यापासून दूर राहा,' असे त्यांनी संदेशात म्हटले आहे. अधिकाऱ्यांनी लोकांना तत्काळ उंच ठिकाणी जाण्याचे आणि किनारा व नद्यांपासून दूर राहण्याचे आवाहन केले आहे. मदत आणि आपत्कालीन सेवा परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत आणि संभाव्य नुकसानीचे मूल्यांकन केले जात आहे.